Publication: Prahaar
Date: 3/1/2020
Page: 3
Column: 1

प्रहार
शुक्रवार, ३ जानेवारी २०२०

# मेरी संगिनी मेरी मार्गदर्शिकाचे अनावरण

3/1

**मुंबई :** अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) कडून मुंबईतील आरे कॉलनीमधील एका समारंभामध्ये 'मेरी संगिनी मेरी मार्गदर्शिका' या प्रकल्पाचे अनावरण करण्यात आले. यानिमित्ताने बोलत असताना अदाणी फाउंडेशनच्या संचालिका सुषमा ओझा म्हणाल्या की, 'एक संगिनी म्हणून या समुदायाच्या उमेदवारांना प्रशिक्षणामार्फत आपापसांतील सल्लागारांच्या माध्यमातून त्यांचे ज्ञान आणि कौशल्य विकास केला जाईल. संगिनी या कौटुंबिक छळासारख्या सामाजिक समस्यांवर काम करतील, त्याचबरोबर सरकारी आस्थापने आणि योजनांचा लोकांना लाभ मिळवून देण्याचा दुवा साधण्याचे देखील त्या काम करतील. समाजामधील महिला नेतृत्व घडवणे आणि त्यांच्यातील गुणांना बढावा देऊन त्यांना नवनवीन बदल घडवून आणणाऱ्या व्यक्ती बनवण्यास सहकार्य करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. 'मेरी संगिनी मेरी मार्गदर्शिका' हा प्रकल्प अदाणी समूहाच्या सीएसआर विभागाकडून प्रारंभिक स्वरूपात तिलकनगरमधील हकदर्शकाच्या संयुक्त विद्यमाने राबवला जाणार आहे.